| | |
|---|---|
| MHKO110014642025 | कौ. हिं. म. सं. अर्ज क्र. २१/२०२५ मधील निशाणी क्रमांक २५ खाली आदेश<br>रूपाली संदिप पाटसुपे वगैरे<br>विरुध्द<br>संदिप गोपाळ पाटसुपे वगैरे |

प्रस्तुत अर्ज हा वि.प यांनी त्यांचेविरूध्द झालेला 'म्हणणे नाही' आदेश रद्द होऊन मिळणेकरीता दाखल केला आहे. अर्जदार यांनी त्यांचे म्हणणे नि. २९ खाली दाखर करून सदर अर्ज मंजूर करणेस तीव्र आक्षेप नोंदवला आहे.

०२. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. त्याचप्रमाणे दोन्ही बाजुचा युक्तीवाद विचारात घेतला.

०३. वि.प.तर्फे विधीज्ञ यांनी असे कथन केले आहे की, वि. प. यांनी दि. १२/०१/२०२६ रोजी सदर प्रकरणामध्ये निशाणी १ वर जबाब व म्हणणे दाखल केले आहे. तेच म्हणणे निशाणी ५ चे सुध्दा आहे परंतु त्यामध्ये नि. ५ च्या अर्जास म्हणणे हा शब्द टाईप करण्याचे राहून गेले होते. त्यामुळे, निशाणी ५ च्या अर्जावर नो-से चा आदेश पारित केलेला आहे. वि. प. यांचे निशणी ५ च्या अर्जावर म्हणणे घेउन गुणवत्तेवर बाजू मांडण्याची संधी देणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. तसेच सदरचा अर्ज मंजूर केल्यास अर्जदार यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती वि. प. करतात.

०४. अर्जदार तर्फे विधीज्ञ यांनी असे कथन केले आहे की, वि. प. यांचा नि. २५ चा अर्ज व त्यातील कथने चुकीची व लबाडीची आहेत. वि. प. यांनी सदरचा अर्ज अर्जदार हिचा मानसिक, आर्थिक छळ करणेकरिता दाखल केलेला आहे. सदर पोटगी मिळणेबाबतचा अर्ज अंतिम आदेशासाठी ठेवला असताना सेट असाईडचा अर्ज हा कायदयाने अमान्य आहे. वि.प. यांनी त्यांच्या कथनांच्या पृष्टयार्थ खालील न्यायनिर्णयांचा संदर्भ घेतला आहे.

1. Arjun Singh Vs. Mohindra Kumar reported in AIR 1964 SC 993.
2. Sangram Singh Vs. Election Tribunal reported in AIR 1955 SC 425
3. Rajnesh Vs. Neha reported in (2021) 2 SCC 324

4. Manish Jain Vs. Akanksha Jain reported in (2017) 15 SCC 801
5. Jasbir Kaur Sehgal Vs. District Judge reported in (1997)7 SCC 7
6. K.K.Modi Vs. K.N. Modi reported in (1998) 3 SCC 573

०५. अर्जदार यांचे पुढे कथन असे की, अर्जदाराने Assets and Liabilities Affidavit आधीच न्यायालयात सादर केले असून त्यावर युक्तिवादही झालेले आहेत. सदरचा अर्ज कार्यवाही लांबविण्याच्या हेतूने दाखल केला आहे. सबब, सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा.

०६. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वि. प. नं. १ यांना दाव्याची नोटीस लागू झाले असून दि. ०७/१०/२०२५ रोजी ते प्रस्तुत कामी हजर झालेले आहेत व वि. प. क्र. २ व ३ हे दि. २२/०१/२०२६ रोजी कामात हजर झाले आहेत. तथापि, वारंवार संधी देउन देखील वि. प यांनी नि. ५ च्या अर्जास वेळेत म्हणणे दाखल न केल्यामुळे त्यांचेविरूध्द दि. १२/०१/२०२६ रोजी म्हणणे नाही असा आदेश पारित करण्यात आला. वि. प. यांनी दि. २२/०१/२०२६ रोजी सदरचा अर्ज व अर्जासोबत पुरसिस दाखल करून निशाणी १ वर जे म्हणणे दाखल केले तेच म्हणणे नि. ५ चे समजण्यात यावे असे कथन केले. वि. प. यांना म्हणणे दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत नमूद केलेले कारण हे प्रथमदर्शनी संयुक्तिक वाटत नाही. तथापि, प्रस्तुतचे प्रकरण हे गुणदोषावर चालून निकाली होणेकरीता व वि. प. नं. १ यांना झालेला विलंब माफ होउन त्यांचे म्हणणे रेकॉर्डवर येणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. सदरचा अर्ज मंजूर केलेस अर्जदार यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सदर न्यायनिर्णय व कायदयाची तत्वे लक्षात घेता वि. प. नं. १ यांना त्यांची बाजू मांडण्यास संधी देणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. परंतु, वि. प. नं. १ यांनी म्हणणे देण्यास विलंब केल्यामुळे अर्जदाराला जो असोयीस्करपणा झाला त्याकरीता सदर वि. प. यांना भरपाई खर्च लावल्यास योग्य व संयुक्तिक आहे. याकरीता, खालील आदेश पारीत करण्यात येतो-

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | वि.प. नं. १ यांनी रक्कम रु. १०००/- (रुपये एक हजार फक्त) अर्जदार यांना देण्याच्या अटीवर प्रस्तुत नि. २५ चा अर्ज मंजूर करण्यात येतो. |

| | |
|---|---|
| २. | वि. प.नं. १ यांनी दाखल केलेले म्हणणे रेकॉर्ड वर घेण्यास परवानगी देण्यात येते. |

sd/-

दि. १०/०३/२०२६
पेठवडगाव

**( आर. एस. मोरे )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठवडगाव